जिल्हा परिषदेतर्फे वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या सेवाविषयक मुद्यांवर मार्गदर्शनासाठी करण्यात येणारे संदर्भ.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः एपिटी २०१४/प्र.क्र. ११/ आस्था-८**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
मंत्रायल, मुंबई, ४० ०००१,
दिनांक १९ मार्च, २०१४

**वाचा —**

**शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक- जिपसे २००६/प्र.क्र. ७५३/आस्था-७, दिनांक २६ मे, २००८**

**परिपत्रक —**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये विहित केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम, १९६७ प्रसृत करुन त्यामध्ये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सेवेच्या विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये रजा, सेवानिवृत्ती, निवृत्ती वेतन, प्रवास भत्ता, शिक्षा इत्यादी बाबीं महाराष्ट्र नागरी सेवेमधील राज्य शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना जशा लागू होतात त्याप्रमणे त्या जिल्हा परिषद कर्मचा-यांना योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषदांमधील “क” व “ड” गटाच्या कर्मचाऱ्यांना वेतनाढ, ज्येष्ठता, पदोन्नती, सेवानिवृत्ती याबाबतही तशाच प्रकारच्या तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत व त्यांसदर्भात निर्णय घेण्यास नियुक्ती प्राधिकारी हे सक्षम आहेत. तसेच या कर्मचा-यांना मानीव दिनांक देण्याबाबतचे अधिकार शासनाने विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश), नियम १९६७ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ प्रसृत करण्यात आले असून त्यानुसार जिल्हा परिषदांमधील गट “क” व “ड प्रवर्गातील जिल्हा परिषदांमधील कृषी, पशुसंवर्धन, सहकार, शिक्षण, आरोग्य, लेखा, अभियांत्रिकी, समाज कल्याण अशा विविध विभागांतील संवर्गासाठी सेवा प्रवेश तसेच शिस्त व अपील नियम विहित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये नामनिर्देशन, पदोन्तीबाबतही विनिर्दिष्ट अशा तरतूदी आहेत. तसेच पदोन्तीच्या राखीव कोटयांतून नामनिर्देशनाने भरण्याची मंजूरी इत्यादी विषयी संदर्भ शासनाकडे करण्यात येतात. शासनाने प्रत्यायोजित केलेल्या अधिकारासंबंधात नियुक्ती प्राधिका-यांनी त्याच्या स्तरावर निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश), नियम, १९६७ मध्ये विहित केल्यानुसार नियुक्ती प्राधिकारी/निवड मंडळ आयुक्तांच्या समंत्तीने नामनिर्देशन व पदोन्नती यांच्या प्रमाणामध्ये शिथील करण्याच्या तरतूदीही अंतर्भूत आहेत. असे असतानाही शासनाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात, ही बाब उचित नाही. जिल्हा परिषदांमधील सेवाविषयक बाबी संदर्भात शासनाने

वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार नियुक्ती प्राधिकारी हे कार्यवाही करण्यास सक्षम असूनही शासनाकडे त्यांसदर्भात संदर्भ करुन अनाठाई कालापव्यय होतो. त्यामुळे नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे मार्गदर्शनासाठी शासनाकडे संदर्भ करण्यांत येऊ नये, अशा सुचना शासन परिपत्रक, जिपसे २००६/प्र.क्र. ७५३/आस्था-७, दिनांक २६ मे, २००८ अन्वये दिलेल्या आहेत. असे असतानाही सदर शासन परिपत्रकामधील सुचनांचे पालन न करता शासनाकडे वेळोवेळी मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. तरी ज्या प्रकरणामध्ये विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी हे कार्यवाही करण्यास सक्षम आहेत, अशाप्रकारचे प्रस्ताव शासनाकडे मार्गदर्शनासासाठी पाठवू नयेत.

२. याबाबत आपणास कळविण्यात येते की, जिल्हा परिषदांमधील सरळसेवा भरतीच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णयानुसार / आदेशानुसार जिल्हा निवड समिती/ नियुक्ती प्राधिकारी कार्यवाही करण्यास सक्षम असूनही शासनाकडे मार्गदर्शनासाठी संदर्भ पाठविण्यात येतात त्यामुळे अनाठायी कालपव्यय होतो व त्यामुळे निवडसूचीची विधी ग्राह्यता संपुष्ठात येते. नियुक्ती प्राधिका-याने याबाबतचे नियम / पुर्वीचे शासन निर्णय, आदेश यातील तरतूदींचा अभ्यास करुन त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा. तसे करणे शक्य नसल्यास, त्याबाबत संबंधीत नियम / तरतूदी सुस्पष्टपणे नमूद करुन विभागीय आयुक्तांकडे पाठवावे. विभागीय आयुक्तांनी त्यांचे स्तरावर उपायुक्त (आस्थापना) इत्यादी अधिका-यांमार्फत त्याचा निपटारा करुन संबंधीतांस मार्गदर्शन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०३२७११०७०९४७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rahate Ganpat K

Digitally signed by Rahate Ganpat K
DN: CN = Rahate Ganpat K, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2014.04.04 15:43:46 +05'30'

(ग. के. रहाटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सह सचिव/उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन-२५ मर्झबान पथ मुंबई ४००० ०१
२. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. निवड नस्ती-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन-२५ मर्झबान पथ मुंबई ४००० ०१